

Jan 2018

ISSN: 2454-5503
IMPACT FACTOR: 4.197(IIJIF)
(UGC Approved
Journal No. 63716)

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

VOL. 4 NO. 1 JAN. 2018
A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL

**SPECIAL ISSUE**

On the Occasion of One Day National Conference On

## WOMEN EMPOWERMENT IN ANCIENT TO MODERN PERIOD

27th January, 2018

**(Book II)**



*Editor*
**Mr. Pawde K. W.**

*Principal*
**Dr. A. D. Mohekar**

ORGANIZED BY
DEPARTMENT OF HISTORY
DNYAN PRASARAK MANDAL'S
SHIKSHAN MAHARSHI DNYANDEO MOHEKAR MAHAVIDYALAYA,
KALAMB. DIST. OSMANABAD

ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

# CONTENTS


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील अग्रणी महिला कस्तुरबा गांधी | डॉ.शिवराज बोकडे | 07 |
| 2. | एकोणीसाव्या षतकातील स्त्री सबलीकरणाच्या प्रयत्नात.... | प्रा.विकास टकले | 10 |
| 3. | महिलाविषयक भारतीय कायदे व महिलासंरक्षण .... | प्रा.डॉ.कुलकर्णी जयश्री | 13 |
| 4. | महात्मा फुले यांच्या विचार व कार्यातील महिला सबलीकरण | डॉ. शरद उ.गावडे | 16 |
| 5. | समाजसुधारकांचे महिला सबलीकरणात योगदान | प्रा.डॉ.आर यु हिरे | 19 |
| 6. | र.धों. कर्वे यांचे स्त्री सशक्तीकरर्णाविषयक विचार | डॉ. एस .जी. बेंजलवार | 21 |
| 7. | आधुनिक महाराष्ट्रातील महिला सबलीकरणासाठी.... | प्रा. राजभोज संदिप | |
| 8. | महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक क्षेत्रातील महिलांची स्थिती | प्रा. वंदना घोडके | 24 |
| | | प्रा. सोपान नवथर | 26 |
| 9. | Modern Education in 19th Century in Maharashtra ... | Khodave Dnyaneshwar | 30 |
| 10. | वैदिक कालखंडातील स्त्री: ऐतिहासिक परामश्र्ज्ञ | प्रा.माधवी महाके | 31 |
| 11. | आधुनिक स्त्रिवाद आणि स्त्रयांचे सबलीकरण - एक आढावा | प्रा.डॉ. जिरेवाड लक्ष्मीकांत | 35 |
| 12. | स्वातंत्र्य लढ्यातील महिलांचा सहभाग- एक अभ्यास | प्रा.डॉ.जी.पी.फसले | 38 |
| 13. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर व स्त्री सबलीकरण | प्रा. रघुनाथ व्यंकटी घाडगे | 40 |
| 14. | मध्ययुगीन काळातील साहित्या क्षेत्रातील कर्तुत्वान स्त्रीया | प्रा. डी. डी. जाधळे | 43 |
| 15. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महिलांचे सबलीकरण | प्रा. तारू एन. एम. | 45 |
| 16. | भारताच्या स्वातंत्र्य पूर्व काळात महिला सबलीकरणासाठी ... | प्रा. अनिल बोराडे | 47 |
| 17. | शैक्षणिक धोरण आणि महिला सबलीकरण | प्रा.डॉ.अंजली ग. सूर्यवंशी | 49 |
| 18. | एकोणिसावे शतक,विधवा पुनर्विवाह व ज्ञानोदय | डॉ.भावना पाटोळे | 52 |
| 19 | १८५७ च्या उठावातील स्त्रियाचे योगदान | प्रा.डॉ.अंभुरे एस.डी. | 56 |
| 20. | Relevance Of Swami Vivekananda's Thought ... | Dr. Mukund Devarshi | 58 |
| 21. | प्राचीनभारतीय स्त्री जीवनाचा आढावा | प्रा.संजय भिमराव तोंडारकर | 61 |
| 22. | Saint Janabai and Warkari Sect | Dr. Swarali C. Kulkarni | 64 |
| 23. | शिक्षण और महिला सक्षमीकरण | प्रा. चौधरी शफिक लतिफ | 67 |
| 24. | हैद्राबाद मुक्तिलढ्यातील महिलांचे योगदान | डॉ. दुधभाते फुलचंद सुर्यभान | 69 |
| 25. | भारतीय स्वातत्र्य चळवळीत महिलांचा सहभाग | डॉ.संतोष सु.कोटुरवार | 71 |
| 26. | शेतकरी संघटनेत महिलांचे योगदान | प्रा. अविनाश ब. अवचट | 74 |
| 27. | मध्ययुगीन काळातील एककर्तृत्ववान स्त्री : अहिल्याबाई होळकर | प्रा.पावडे ग्वोब्राजी वामनराव | 77 |
| 28. | समाज सुधारक आणि महिला सबलिकरण एक अध्ययन | प्रा.डॉ.टि. डी. राजगुरे | 79 |
| 29 | Literature: A Tool of Empowering Women | Kuchekar Shailaja B. | 81 |
| 30. | स्वातत्र्य लढयातील महिलांचा सहभाग | डॉ.सुचिता नि. किडीले | 82 |
| 31. | जिजाऊंच्या जडणघडणीतील छत्रपती शिवाजी | प्रा. नारायण अंभोरे | 84 |
| 32 | होळकर घराण्यातील महिलांचे योगदान | श्री.रामप्रसाद व्हडगीर | 86 |
| 33 | हैद्राबाद मुक्तिसंग्राम लढ्यातील महिलांचे शौर्य | श्रीमती.शिंगणे के.बी. | 88 |
| 34. | शैक्षणिकधोरणे व महिला सक्षमीकरण | प्रा. श्रीमती सरवदे वर्षा ता. | 90 |
| 35 | डॉ. ताराबाई परांजपेचे हैदराबाद मुक्तीसंग्रामातील कार्य | प्रा. गुंजकरसोमनाथ लक्ष्मण | 93 |
| 36. | महिला सक्षमीकरण : एक सामाजिक दृष्टिक्षेप | पंकज भुजंगराव हाके | 94 |
| 37. | महिला सशक्तिकरण : हिन्दी महिला कथाकारों के संदर्भ में | डॉ. शरद शेषराव कदम | 97 |
| 38. | 'साहित्य क्षेत्र में आया हुआ महिला सशक्तिकरण' | मोरे वर्षा नागोराव | 100 |
| 39. | मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध व महाराणी ताराबाई | डॉ.सुधाकर दिगंबरराव मुंगल | 102 |
| 40. | 'भारतीय स्वातंत्र्य लढयातील क्रांतिकारी महिलांचा सहभाग' | श्री.कोंढारे जे.व्ही | 106 |
| 41. | प्राचीन ते आधुनिक काळातील कर्तुत्ववान स्त्रीया | श्री. प्रदीप सुधाकर चव्हाण | 108 |
| 42. | स्वातंत्र्यलढयातील महिलांचा सहभाग | श्री. लक्ष्मण नथ्थुप्रसाद गोरे | 111 |
| 43. | स्त्री सबलीकरणामध्ये ताराबाई शिंदे यांचे योगदान | रविंद्र भगवान दांडगे | 113 |

Chronicle of Humanities and Cultural Studies
(UGC Approved Journal No. 63716)
ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

३.

# महिलांविषयक भारतीय कायदे व महिलासंरक्षण
## (निवडक लैंगिक कायदे संदर्भात)

**प्रा.डॉ.कुलकर्णी जयश्री रमेश**
इतिहास विभागप्रमुख,
व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, उस्मानाबाद

**प्रास्ताविक :-**

भारतीय स्त्रीयांचे स्थान जगातील इतर देशांमधीलस्त्रीयांच्या तुलनेत प्रत्येक कालखंडामध्ये वेगवेगळे राहिलेले आहे.प्राचीन काळात जगाच्या बहुतेक भागात दुय्यम व मागासलेले असलेले स्त्रीजीवन भारतात मात्र स्वयंभू, स्वतंत्र व परिपूर्णहोते.तर मध्ययुगात युरोपीय राष्ट्रांमध्येस्त्री हक्कविषयक जाणीव व जागृतीहोत असताना हेच भारतीय स्त्री जीवन मात्र चार भिंतीत बंदिस्तहोताना, परावलंबी आणि शोषितहोताना दिसते.आधुनिक कालखंडातही जगाच्या तुलनेत भारतीय स्त्री-सुधारणेची पहाट उशिरानेच झाली.ब्रिटीशांनी आपल्या कालखंडात भारतीय स्त्रीयांबाबतीत काहीसुधारणात्मक धोरणे अवलंबली.याबाबत वैचारिक जागृती, शिक्षण प्रसार, सामाजिक उत्थान, याबरोबरच स्त्री हक्कविषयक, सुरक्षा विषयक आणि अनेक अनिष्ट चालीरितींविरोधी कायदेही केले.या कायद्यांना पूर्णत: यश जरी लाभले नाहीतरीत्यामुळे भारतीय समाजात स्त्री-पुरूष समानता, स्त्री मुक्ती, स्त्रीयांच्या पुनरूत्थानाच्या जाणीवेचे बीजारोपण नक्कीच झाले.पुढे भारतीय स्वातंत्र्यानंतर याच सुधारणांच्या आधारेस्त्रीसुधारणेचे प्रयत्न कायदेशीरपणे केले गेले.स्त्रीयांविषयक घडत गेलेल्या विविध घटना व गुन्ह्यांच्या अनुषंगाने या कायद्यांमध्ये बदल होऊन नवनवीन कायदे व कलमांची भर पडत गेली.त्यामध्ये प्रामुख्यानेस्त्री-सुरक्षेला प्राधान्य दिले गेले.

**उद्दिष्टे :-**

१) महिलांविषयक निवडक भारतीय कायद्यांच्या वाटचालीवर प्रकाश टाकणे.
२) महिला संरक्षणाविषयक, विशेषत: लैंगिक संदर्भातील भारतीय कायदेहे त्यांच्या परिकक्षेत कितपत पुरेसे व उपयुक्तठरतात, याची चर्चा करणे.
३) वरील कायद्यांच्या गैरवापरावर प्रकाश टाकणे.
४) स्त्री विषयक गुन्हे रोखण्यात सद्य कायदे कितपत यशस्वी आहेत, याची चर्चा करणे.

**संशोधन पध्दती :-**

भारतीय दंड विधन (भादंवि) संदर्भातील पुस्तके, वर्तमानपत्रे, कायदेविषयक नियतकालिकांमधील संदर्भांच्या सहाय्याने विश्लेषण.

**विषय मांडणी :-**

काळ बदलतो त्याप्रमाणे परिस्थिती बदलते आणि परिस्थितीच्या अनुषंगाने मानवी वर्तनाला नियंत्रित करणारे कायदे - नियमही बदलतात.भारतावरील ब्रिटीशांची सत्ता संपुष्टात येताच भारताच्या राजकीय परिस्थितीबरोबर सामाजिक परिस्थितीतही बदल झाला.त्याचे पडसाद स्त्रीजीवनावरही उमटले.परिणामीस्त्रीयांच्या सर्वांगिण स्थानात बदल झाला.हे परिणाम दोन प्रकारचेहोते. एक म्हणजेस्त्रीयांच्या सामाजिक कौटुंबिक स्थानातीलसकारात्मक बदल आणि दुसरे म्हणजे स्त्रीयांबाबत घडणाऱ्या गुन्ह्यांमधील बदल. स्वातंत्र्यानंतरच्या ७० वर्षात या दोही बाबतीत वेगाने बदल होत गेले आणि त्याचाच परिणाम म्हणून स्त्रीयांविषयीच्या कायद्यातही बरेच सुधारणात्मक बदल होत गेले. घटनेनुसारस्त्री-पुरुष समानता मान्य केलेली असली, तरी परंपरागत भारतीय पुरूषप्रधान मानसिकतेमुळेतसेच लिंगभावातून स्त्रीविषयक अनेक गुहे घडताना दिसतात.त्यामध्ये लैंगिक व कौटुंबिक हिंसाचार संदर्भातील गुह्याचे प्रमाण अधिक आहे.त्यामुळे या संदर्भातील अनेक कायदे स्वतंत्र भारतात वेळोवेळी आणि गरजेनुसार निर्माण करण्यात आले.या कायद्यांच्या महिलासंरक्षण विषयक उपयुक्तते संदर्भात, तसेच त्यांच्या अंमलबजावणी संदर्भात चर्चा करण्याचा प्रयत्न या ठिकाणी केलेला आहे.

**लैंगिक गुन्ह्यासंदर्भातील कायदे :-**

**कलम २९२ भा.दं.वि -** सार्वजनिक ठिकाणी अश्लिल हावभाव करणे, शिट्टी वाजवून छेडणे, जेणेकरून एखाद्यास त्रास होईल.

**कलम ५०९ भा.दं.वि -** जो कोणी एखाद्या स्त्रीला लज्जा उत्पन्न होण्याचे उद्देशाने व तिच्या स्त्रित्वाचा अपमान होईल ह्या उद्देशाने, तसे हावभाव, आवाज, कृती, करेल अथवा असेसाहित्य, वस्तू अवयव इत्यादी दर्शवेल व तिचे लक्ष वेधले जाईल अशी कृती करेलतर त्यास दोषसिध्दीनंतर एक वर्ष कारावास, द्रव्यदंड अथवा दोन्हीन्ही अशी शिक्षा ठोठावली जाते.[१]

**कलम ३५४ भा.दं.वि. -** जो कोणी एखाद्या स्त्री ला लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन करेल व त्यासाठी आपल्या शारीरिक बळाचा हेतूपूर्वक वापर करेलतरतो कलम ३५४ (विनयभंग) ह्या कलमाखाली दोषसिध्दीनंतर अपराधी ठरवण्यात येईल व त्यास दोन वर्ष कारावास, द्रव्यदंड वा दोन्ही अशी शिक्षा होवू शकते.[२]

**कलम ३६० भा.दं.वि. -** जो कोणी एखाद्या व्यक्तीस भारताबाहेर, त्या व्यक्तीच्या संमतीशिवाय अथवा ती व्यक्ती ज्यांच्या ताब्यात आहे, त्यांच्या संमतीशिवाय जबरदस्तीने पळवून नेईलतर अशी कृती करणारी व्यक्ती दोषसिध्दीनंरत त्या कलमानुसार शिक्षेस व दंडास पात्र असेल.[३]

ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

**कलम ३६१ भा.दं.वि -** जो कोणी फूस लावून एखाद्या अल्पवयीन व्यक्तीस कायदेशीर ताब्यातून पळवून नेईल अशा व्यक्ती दोष सिध्दी नंतर असे कृत्य करणारी व्यक्ती त्या कलमानुसार शिक्षा व द्रव्यदंडास पात्र असेल.

ह्या कलमाुसार पिडीत व्यक्ती हीस्त्री जातीची असेलतर तिचे वय १६ ते १८ वर्षांच्या आतील असावे व जर पुरुष असेलतर १८ वर्षांच्या आत असावे. अर्थात इथे पिडीत व्यक्तीची संमतीहा प्रश्नच उदभवत नाही कारणती अल्पवयीन असते. [५]

**कलम ३६२ भा.दं.वि. -** कोणी एखाद्या व्यक्तीस त्याच्या इच्छेविरुध्द एखाद्या ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यास बळाचा वापर करून भाग पाडत असेलतर असे कृत्य करणारी व्यक्ती सदर कलमानुसार दोषी धरली जाते व त्यास ७ वर्षांपर्यंतचा कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा ठोठावण्यात येते. कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा ठोठावण्यात येते. (सदर कलमाची शिक्षा ही ३६३ भा.दं.वि. कलमानुसार दिला जाते.)

**कलम ३६३ भा.दं.वि. -** १)जो कोणी एखाद्या अल्पवयीन व्यक्तीस व व्यक्ती आपण स्वतः कायदेशीर ताबेदार नाहीहे माहीत असून नहीसदर अल्पवयीन व्यक्तीचा ताबा स्वतःकडे घेईल व त्या अल्पवयीन व्यक्तीचा वापर भीक मागण ह्या उद्देशाकरीता करत असेल २) अथवा त्या अल्पवयीन व्यक्तीस अपंग बाबत असेल व भीक मागण्यासाठी त्या अल्पवयीनचा वापर करीत असेलतर असे कृत्य करणाऱ्या व्यक्तीस दोष सिध्दी नंतर, आजन्म कारावास (जन्मठेप) व द्रव्यदंड अशा शिक्षा ठोठावण्यात येतात. [६]

**कलम ३६४ भा.दं.वि. -** जो काणी एखाद्या व्यक्तीस (इथे वयाचे बंधन नाही) ठार मारण्याचे उद्देशाने पळवून नेले असेलतर दोष सिध्दीनंतर दहा वर्ष व द्रव्यदंड अशी शिक्षा ठोठावण्यात येते. [७]

**कलम ३६४ अ भा.दं.वि -** खंडणीसाठी एखाद्या व्यक्तीस पळवून नेले असेल व त्यास ठार मारण्याची भिती दाखवून, डांबून ठेवले असेलतर त्यास देहांत शासन व द्रव्यदंडाची शिक्षा ठोठावली जाते. [७]

**कलम ३६५ भा.दं.वि. -** जो काणी एखाद्या व्यक्तीस गुप्त ठिकाणी डांबून ठेवण्याच्या उद्देशाने पळवूननेईलतरतो अपराधी ह्या कलमानुसार दोषी ठरवला जावून दोषसिध्दीनंतर ७ वर्षांचा कारावास वा द्रव्यदंड, अथवा दोन्ही अशी शिक्षा ठोठावण्यात येते. [८]

**कलम ३१२ भा.दं.वि. -** जो कोणी एखाद्या स्त्रीस जबरदस्तीने गर्भपात करणेस व भ्रुणास इजा होईलह्या उद्देशाने किंवा नवजात अर्भकास उघड्यावर टाकेल किंवा अशा जन्माबाबत गुप्तता ठेवण्याचे उद्देशाने असे कृत्य करेलतर अशा कृत्यास सात वर्षे कारावास व द्रव्यदंड अथवा दोन्हीही शिक्षा. दोर्षसिध्दीनंतर ठोठावली जाते. [९]

**कलम ३१३ भा.दं.वि. -** एखाद्या स्त्री च्या संमतीविना जो कोणी तिच्या गर्भपातास कारणीभूत होत असेल / झाला असेलतर असे कृत्य करणाऱ्या व्यक्तीस दोषसिध्दीनंतर जन्मठेप अथवा दहा वर्षापर्यंत कारावास व द्रव्यदंड अशी शिक्षा दोषसिध्दीनंतर ठोठावली जाते. [१०]

**कलम ३१४ भा.द.वि. -** जो काणी जबरदस्तीने गर्भपात करण्याच्या उद्देशानेसदरचे कृत्य करताना. त्या स्त्री च्या मृत्यूस कारणीभूत होत असेलतर अशा कृत्य करणाऱ्या व्यक्तीस दहा वर्षापर्यंत इतका कारावास व द्रव्यदंड अथवा दोन्ही अशी शिक्षा दोषसिध्दीनंतर ठोठावली जाते. [११]

**कलम ३६६ भा.दं.वि. -** लग्न करण्याच्या उद्देशाने एखाद्या स्त्रीस तिच्या संमतीविना पळवूननेणे.ह्या कृत्यास दोषसिध्दीनंतर दहा वर्षवा द्रव्यदंड अशी शिक्षा ठोठावली जाते.तसेच ह्या कलमाअंतर्गत तिला कुणाही इतर व्यक्तशी शरीर संबंधाला वा वाममार्गाला लावण्याच्या उद्देशाचाही समावेश होतो. [१२]

**३६६ ए भा.दं.वि. -** ह्या कलमाअंतर्गत अल्पवयीन मूलीस वरील कलम ३६६ मधील उद्देशाने पळवूननेणे त्याचा समावेश होतो.शिक्षा १० वर्ष, द्रव्यदंड. अथवा दोन्हीही.

**कलम ३६६ बी भा.दं.वि. -**ह्या कलमाअंतर्गत कलम ३६६ मधील उद्देशाने भारताबाहेरून वा जम्मू-काश्मिर मधून वय २१ पेक्षा कमी वयाच्या स्त्रीस/स्त्रियांना भारतात आणले गेले असेलतर अशा गुह्यास १० वर्षे कारावास व द्रव्यदंड. अथवा दोन्हीही अशी शिक्षा ठोठावली जाते. [१३]

**कलम ३७६ भा.दं.वि. -**ह्या कलमांतर्गत एखाद्या स्त्रीवर बलात्कार करण्याच्या उद्देशाने केले जाणाऱ्या कृत्याचा समावेश होतो.त्यामध्येसदर कलमांमध्येसुधारणा करण्यात येवून खालील कलमांचा समावेश करण्यात आलेला आहे.

**कलम ३७६ ए भा.दं.वि. -** स्वतःचा पत्नी बरोबर न्यायीक विभिन्न असताना म्हणजेच घटस्फोटाचे प्रकरणन्यायालयात/न्यायप्रविष्ट असताना व सदर कोर्टानेतात्पुरते विभक्त राहण्याचा आदेश पारीत केलेला असतानाच्या स्थितीत, असे कृत्य केले असेलतर २ वर्षे शिक्षा वा दंड अशीतरतूद आहे.

**कलम ३७६ बी भा.दं.वि. -**सरकारीनोकराने त्याच्या ताब्यातील स्त्री वर बलात्कार करणे. शिक्षा ५ वर्षे वा दंड, वा दोन्हीही.

**कलम ३७६ सी भा.दं.वि. -** तुरुंग अधिकारी, सुधारगृह इत्यादी मधील अधिकाऱ्यांनी त्यांच्या ताब्यात असलेल्या स्त्रीवर बलात्कार केला असेलतर शिक्षा ५ वर्षापर्यंतचा कारावास व द्रव्यदंड अथवा दोन्हीही. [१४]

**लैंगिक अत्याचार गुन्ह्यासंदर्भातील कायद्यासंदर्भातील विश्लेषण :-**

या संदर्भातील भादंवि कलम क्र.१९२, ५०९, ३५४ ही कलमे विनयभंग, छेडछाडीशी संदर्भित आहेत. याबाबत पिडीत व्यक्तीची साक्ष शिक्षा होण्यास पुरेशी आहे.परंतु व्यवहार्य अडचण अशी आहे की, समाजभय, लज्जा, बदनामी, दुर्बलता इ.अनेक कारणांनी पिडीत महिला न्यायालयापर्यंत पोहचतच नाही किंवा तिला तिचे सगे-संबंधी तिथपर्यंत पोहोचू देत नाहीत.त्यामुळे या संदर्भातील आरोपींना अशी कृत्ये

ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

करण्याची भीती वाटत नाही.आणि ही अश्लिलता सर्रासपणे, उघडपणे करण्याचीहिंमत वाढते.यामागे लैंगिकबरोबरच मानसिक विकृती, नैराश्य, समुहाचे मानसशास्त्र अशी अनेक कारणे असू शकतात.

भादंवि कलम ३६०, ३६१, ३६२, ३६३ अ, ३६४, ३६४ए, ३६५, ३६६, ३६६ ए, बी ही कलमे अपहरणाशी संबंधित आहेत.तीस्त्रीया व पुरूष दोघांनाही लागू पडतात.यामध्ये प्रामुख्यान अल्पवयीनांना केंद्रिभूत मानलेले दिसते.त्यामुळे अल्पवयीनांचे यासंदर्भातील अज्ञान व अजाणतेपण, त्यांच्या पालकांचे अज्ञान, भीती, दुबळेपणा वा सक्षम पालकत्वाचा अभाव, आरोपीची दडपशाही या कारणामुळे याही गुन्ह्यांसदर्भात न्यायालयापर्यंत येणाऱ्यांचे प्रमाण कमी असते. पण जागरूक व्यक्ती, त्रयस्ताने वा पोलिसांनी यामध्ये पुढाकार घेतल्यास गुन्हा सिध्द झाल्यावर आरोपीस कडक शिक्षा होऊ शकते.बहुतेकवेळा अल्पवयीन मुलींना पळवून नेऊन विवाह करणे, शारीरिक अत्याचार करणे, शरीर विक्रयास भाग पाडणे वा अत्याचार करूनठार करणे असे प्रकार घडू शकतात.त्यावेळी या कायद्यांच्या आधारे अशा अपप्रवृत्तींना आळा बसू शकतो.

भादंवि कलम ३१२, ३१३, ३१४ ही कलमे गर्भपाता संदर्भातील आहेत.सद्य स्थितीत मोठ्या प्रमाणत होत असलेल्या स्त्री-भ्रूण हत्येच्या संदर्भात अथवा अनैतिक संबंधातील अपत्यासंदर्भात असे गुन्हे घडू शकतात.त्यामुळेहे कायदे काळाची गरज बनले आहेत. मात्र बऱ्याचवेळा गर्भजलचिकित्सा व स्त्रीभ्रूण हत्येस सामाजिक मानसिकतेतूनस्त्रीया स्वतःच कारणीभूत असतात. आपल्या पारंपारिक पुरूषप्रधानसमाजरचनेनुसार पुत्रप्राप्ती अत्यावश्यक मानण्याचेसंस्कार स्त्रीमनावर झालेले असल्याने बेकायदेशीरपणे व गोपनियतेनेनेहे गुन्हे घडतात. अशावेळी दोषारोप कोण लावणार?

भादंवि कलम ३७६, ३७६ ए, बी, सी, डीही कलमे बलात्काराशी संबंधीत आहेत.बलात्कार हा वर्तमान भारतातील ज्वलंत प्रश्न आहे.या संदर्भातील राजस्थानातील भंवरीदेवी प्रकरण व विशाखा निवाडा या घटनांपासून विविध पातळ्यांवर चर्चा, जागरूकताहोऊन कायद्यांमध्ये अनेक बदल करण्यात आले. बलात्कारींना कडक शिक्षांचे प्रयोजन केल्याने अशा घटनांना अटकाव होऊ शकतो

**संदर्भ सूची :-**

१) जस्टीस दस्तगीर - दंड विधान (IPC) कमल लॉहाऊस, कलकत्ता, २०१०, ७ वी आवृत्ती, पृष्ठ क्र.२४८, ६४१-४२
२) कित्ता - पृष्ठ क्र.३८४
३) कित्ता - पृष्ठ क्र.३८९
४) कित्ता - पृष्ठ क्र.३८९, ९०
५) कित्ता - पृष्ठ क्र.३९२
६) कित्ता - पृष्ठ क्र.६९६
७) कित्ता - पृष्ठ क्र.४०१
८) कित्ता - पृष्ठ क्र.४०३
९) रतनलाल, धीरजलाल-भारतीय दंडविधान, बटरवर्डथस् प्रकाशन, दिल्ली, आवृत्ती प्रथम पृष्ठ क्र.३५०
१०) कित्ता - पृष्ठ क्र.३५१
११) कित्ता - पृष्ठ क्र.३५१-५२
१२) कित्ता - पृष्ठ क्र. ४०४
१३) कित्ता - पृष्ठ क्र.४०६, ४०७

❑❑❑